नि.दि.दा.क्र.६८/२०१४
नि.क्र.१६६

**मी सत्य प्रतिज्ञेवर शपथपूर्वक निवेदन करतो की,**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

माझे संपूर्ण नाव - गणेश व्यकंटराव जाधव,

वय - ४५ वर्षे,

व्यवसाय- नोकरी (निमतानदार), उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर.

राहणार - लातूर, जि. लातूर.

**वादीकरीता सरतपास विधीज्ञ श्री.एम.आर.जगताप यांच्या तर्फे सुरू**

१. दि.१७/१२/२०१५ रोजी मी उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, निलंगा येथे कार्यरत होतो. त्या दिवशी मी कोर्ट कमिशन मोजणीकामी मो.र.क्र.९४/२०१५ सर्वे क्र.१६, गट क्र.१०४, ५७, ५६, ५९, ६०, ५५ व ५८ च्या मोजणीकामी तळीखेड गावी गेलो. मोजणीपूर्वी मी सर्व संबंधितांना नोटिसा दिल्या. त्या नोटिसा सर्व संबंधितांना बजाविल्या आहेत. त्याची क प्रत आमच्या कार्यालयात आहे. मी दि.१७/१२/२०१५ रोजी गेलो होतो. मी जायमोक्यावर जावून सर्वे क्र.१६ व त्यामधील गट क्र.५५, ५६, ५७, ५८, ५९, ६० व १०४ पैकीची मोजणी केली. जायमोक्यावर मी मोजणी पंचनामा केला. मोजणीअंती मला वादी पंडीत शंकर खलग्रे यांच्या गट क्र.६० वर, पश्चिम बाजूचे गट क्र.१०४ मधील प्रतिवादी भिमराव शंकरराव पाटिल यांनी ६ आर क्षेत्राचे अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले. तसेच वादी यांच्या गट क्र.६० च्या उत्तर बाजूस गट क्र.६१ ने वादीच्या गट क्र.६० वर ७ आर क्षेत्राचे अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले. वादीच्या गट क्र.६० मध्ये एक विहीर असल्याचे देखील जागेवर दिसून आले. त्याचा उल्लेखही मी मोजणी नकाशावर केला. त्यानंतर मी तसा मोजणी अहवाल तयार केला. त्यानंतर आमच्या कार्यालयाने मोजणी नकाशाची 'क' प्रत, पंचनाम्याची सत्य प्रत व अहवाल न्यायालयात दाखल केले. मोजणी नकाशाची 'क' प्रत मला आता दाखविली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का आहे. त्यावर माझी सही आहे. मोजणी नकाशाची 'क' प्रत **(नि.क्र.१६७)** वर आहे. पंचनाम्याची सत्य प्रत मला आता दाखविली. त्यातील

मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का आहे. त्यावर माझी सही आहे. पंचनाम्याची सत्यप्रत **(नि.क्र.१६८)** वर आहे. मोजणी अहवाल मला आता वाचून दाखविला. त्यावर कार्यालय प्रमुखाची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पूर्ण.**

<u>प्रतिवादी क्र.१ ते ३ करीता उलटतपास विधीज्ञ श्री.जे.व्ही.धुमाळ यांचे तर्फे</u>

२. तळीखेड गावचा गाव नकाशा आमच्या कार्यालयात आहे. तो गाव नकाशा केव्हा तयार झाला हे मी सांगू शकत नाही. तो गाव नकाशा एकत्रीकरण योजनेत तयार झालेला आहे. मोजणी नकाशा (नि.क्र.१६७) वर मी गट क्र.६० व गट क्र.१०४ पैकीचे क्षेत्र दर्शविलेले नाही, साक्षीदार पुढे स्वत: सांगतात परंतू सदर नकाशा हा एकास एक हजार या प्रमाणात आहे. मोजणी नकाशा (नि.क्र.१६७) हा आमच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या गाव नकाशाशी जुळतो. गाव नकाशा व मोजणी नकाशा (नि.क्र.१६७) हे गट क्र.६० व गट क्र.१०४ हद्दी पावेतो परस्पर जुळते आहेत.

प्रश्न- गट क्र.१०४, गट क्र.५९ व गट क्र.६० याच्यामधून जाणारा नाला हा गाव नकाशा व मोजणी नकाशा (नि.क्र.१६७) मध्ये समान ठिकाणी दिसून येत आहे का ?

उत्तर- नाला ही निश्चित गोष्ट नाही. पाण्याच्या प्रवाहाप्रमाणे ती बदलते. मोजणी नकाशा नि.क्र.१६७ वर जागेवर असणारा नाला दर्शविण्यात आला आहे.

३. दाखल टोच नकाशा मला आता दाखविला, तो आमच्याच कार्यालयातून दिलेला आहे, त्यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का आहे, त्यावर आमच्या कार्यालयाच्या मुख्यालय सहायक यांची सही आहे, टोच नकाशा साक्षीदारास दाखविल्यामुळे त्यास **(नि.क्र.१६९)** देण्यात येते. मोजणी नकाशा (नि.क्र.१६७) वर मी जायमोक्यावर परिस्थितीनुसार वेडया वाकडया रेषेने नाला दर्शविलेला आहे. मोजणी नकाशा (नि.क्र.१६७) वर मी वेडया वाकडया रेषेने दर्शविलेला नाला हा गट

क्र.५९, गट क्र.६० व गट क्र. १०४ गटापैकी क्षेत्रातून जातो हे म्हणणे खरे आहे. तो नाला पोटखराब क्षेत्रा आहे. पोटखराब क्षेत्राची मालकी गट धारकाकडे असते. मोजणी नकाशा (नि.क्र.१६७) वर मी ६ आर क्षेत्राचे अतिक्रमण मी निळया रंगाने दर्शविलेले आहे. तसे निळया रंगाने दर्शविलेले ६ आर क्षेत्राचे अतिक्रमण मी नाल्यात असल्याचे मोजणी नकाशा (नि.क्र.१६७) वर दर्शविलेले आहे हे म्हणणे खरे आहे.

४. मोजणी करीत असताना मी गट क्र.१०४ व गट क्र.६० च्या धारकांचे मालकीचे कागदपत्र मागविले नाहीत, साक्षीदार स्वत: सांगतात, परंतू वादी यांनी मोजणी फिस भरत असताना सदर सर्व गट क्रमांकाचे ७/१२ उतारे दाखल केले होते. हिस्सा फॉर्म क्र.४ चा उतारा मला आता दाखविला, तो आमच्या कार्यालयाने दिलेला आहे, त्यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का व मुख्यालय सहायकाची सही आहे. साक्षीदारास हिस्सा फॉर्म क्र.४ चा उतारा दाखविल्यामुळे त्यास **(नि.क्र.१७०)** देण्यात येतो. ९(३) ९ (४) चा उता-याच्या नकला मला आता दाखविल्या, त्या आमच्या कार्यालयाने दिलेल्या आहेत, त्यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का व मुख्यालय सहायकाची सही आहे. साक्षीदारास ९(३) ९ (४) चा उता-याच्या नकला दाखविल्यामुळे त्यास **(नि.क्र.१७१)** देण्यात येतो.

५. प्रतिवादी यांनी वादी यांच्या काहीच क्षेत्रावर कसलेच अतिक्रमण केलेले नाही व मला ते मोजणीअंती निष्पन्नही झाले नाही हे म्हणणे खरे नाही. मोजणी नकाशा (नि.क्र.१६७) वर दर्शविलेला नाला अनेक धारकांच्या शेतातून पूर्वापार जात असल्यामुळे तो सरकारी आहे हे म्हणणे खरे नाही. मी केव्हाच जायमोक्यावर गेलेलो नाही व कसलीच मोजणी केलेली नाही हे म्हणणे खरे नाही. मी वादी यांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.08.06 17:55:28 +0530

(रवि वि. पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
निलंगा, जि.लातूर

दि.०६/०८/२०२५